महाराष्ट्र शासन

*तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,*
*3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. 1967, मुंबई 400 001.*
दूरध्वनी : 68597458, 68597404, 68597428
E-mail:- desk4@dtemaharashtra.gov.in Web:- http://www.dtemaharashtra.gov.in

---

## करार पध्दतीने नेमणूकीसाठी थेट मुलाखत
## (Walk in interview)

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रम संस्थांतील प्रवेश प्रक्रीया, मान्यता प्रक्रीया व राष्ट्रीय शिखर संस्थांच्या निकषांनुसार अन्य अनुषंगिक कामे पार पाडण्याकरिता गट-अ संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या ०१ (एक) अधिकाऱ्याची करार पध्दतीने नेमणूक करावयाची आहे. त्यासाठी सा.प्र.वि. च्या दि. १७ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार १ वर्ष अवधीकरीता सेवानिवृत्त अधिकारी यांची नेमणूक करण्यासाठी दि. २८/०२/२०२५ रोजी खालील अटी व शर्ती यांची पुर्तता करणाऱ्या अधिकाऱ्यांची थेट मुलाखती ( Walk in interview) ठेवण्यात येत आहेत.

- गट अ संवर्गातील पदावरुन सेवानिवृत्त धारक अधिकाऱ्याचे वय ६५ वर्षा पेक्षा जास्त नसावे.
- तंत्र शिक्षण संचालनालयातील मान्यता प्रक्रीया, प्रवेश नियम तयार करणे, पात्रता नियम तयार करणे, शिखर परिषदांच्या मान्यता प्रक्रीयेवर कार्यवाही करणे, प्रवेश प्रक्रीया व तत्सम न्यायालयीन प्रकरणे हाताळणे इ. क्षेत्रातील किमान ३ वर्षाचा अनुभव.
- तंत्र शिक्षण संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील आस्थापनेवरुन सहाय्यक संचालक (तांत्रिक) व समकक्ष पदाचा अनुभव धारक सेवानिवृत्त अधिकाऱ्यास प्राधान्य.
- सेवानिवृत्त अधिकारी सेवा करण्यास शारिरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे वैद्यकीय व्यावसायीचे प्रमाणपत्र.
- अभियांत्रिकी शाखेतील प्रथम श्रेणीतील पदव्युत्तर पदवी, मात्र पीएचडी धारक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस प्राधान्य.
- नेमणुक करण्यात येणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यास दि. १७ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार पारिश्रमिक अनुज्ञेय राहील.

उपरोक्त अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या गट अ संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या इच्छुक अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्जासह (मुळ कागदपत्रांसह ) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., ०३ महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१ येथे दि. २८.०२.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता उपस्थित रहावे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७.०२.२०२५

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई